# आदिवासी संस्कृतीतील कला : सौंदर्यशास्त्रीय आणि सामाजिक परिमाणे

**प्रस्तावना :**

संस्कृती ही बाब इतकी गुंतागुंतीची, बहुआयामी आणि विविध पैलू व अंगे-उपांगे असलेली आहे कि, तिची सर्वसमावेशक व सर्वमान्य व्याख्या करणे अवघड आहे. सांस्कृतिक मानवशास्त्रात (cultural anthropology) संस्कृती (culture) या संज्ञेच्या अनेक व्याख्या दिलेल्या आहेत, त्या सर्वांचा गोषवारा काढला असता 'संस्कारपूर्ण, संस्कारमय जीवन जगण्याची स्थळ-काळ-विशिष्ट पद्धती म्हणजे संस्कृती' असा ढोबळमानाने अर्थ काढता येतो. विवरणात्मक दृष्टीने पाहता माणूस हा आपल्या जीवनाच्या प्रगतीला अनुकूल असे बदल भोवतालच्या निसर्गात वा पर्यावरणात घडवून आणून - म्हणजेच त्यांच्यावर संस्कार करून - आपले जीवन अधिक सुरक्षित, समृद्ध व सुखमय करण्यासाठी सतत प्रयत्न करीत असतो. त्यासाठी तो स्वत:चे मन, बुद्धी व कल्पनाशक्ती यांच्यावरही संस्कार करून त्यांचा सर्जनशील वापर करतो; भौतिक गरजांबरोबरच आपल्या मानसिक व भावनिक गरजा पूर्ण करण्यासाठी कल्पनेने जी नवनिर्मिती करतो त्या साऱ्यांना स्थूलपणे संस्कृती असे म्हणता येईल.

कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचा वारसा मागील पिढीकडून पुढील पिढीकडे दिला जातो. धर्म, कला आणि विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून औपचारिक तसेच अनौपचारिक शिक्षणपद्धतीचे हे हस्तांतरण होत असते. या प्रक्रियेतून जात असताना मानवी संस्कृती प्रवाही असल्यामुळे सतत पण नकळत थोडी थोडी बदलत राहते. हे बदल आक्रमक, प्रबळ मानवसमूहांची संस्कृती दुर्बल मानवसमूहांवर लादली जाऊन; संप्रेषण-तंत्रज्ञानातील (communication technology) सुधारणांमुळे भिन्न संस्कृतींचा एकमेकींशी संपर्क येऊन; तसेच प्रवास साधनांतील व विज्ञानातील नवीन शोधांमुळे होत असतात. अशा प्रकारे संस्कृती देश - काल - परिस्थितीनुसार तयार होत असते. त्याचप्रमाणे ती देश - काल सापेक्षही असते. संस्कृती व्यक्तीच्या आयुष्याला दिशा देऊन तिचे जीवन घडविते, तर प्रत्येक व्यक्ती-देश-कालाला अनुसरून संस्कृतीचा प्रवाह हळूहळू नकळत बदलत असतो. संस्कृतीचे बाह्यरूप म्हणजे भौतिक साधनसामुग्रीची (mater culture) विविधता व विपुलता; तर संस्कृतीचा गाभा व आंतरीक स्वरूप म्हणजे सुखी व स्वस्थ समाजाला पोषक असा गुणसमुच्चय. माणसांमधील सत्प्रवृत्तीची वाढ करणे, त्याची ज्ञानधारणा वाढवणे, त्याला समाजाभिमुख बनवणे आणि हे सर्व करता करता माणसातील पाशवी वृत्तींचा नाश करीत त्याला उच्च मानवी पातळीवर पोचविणे हे संस्कृतीचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यामुळे समाज व संस्कृती परस्पराश्रयी असून दोघांमध्ये दृढ

समन्वयी संबंध आढळून येतो.

आधुनिक मानवी संस्कृतीच्या अभ्यासकांना सामाजिक संस्थांच्या उगमाबद्दल आणि मानवी व्यवहारांच्या मूलतत्त्वांबद्दल मांडणी करताना आदिवासींच्या संस्कृतीचे आकलन करून घेणे आवश्यक आहे. कारण केवळ भारतापुरते पाहायचे म्हटले तरी भारतीय संस्कृतीचा इतिहास पाहता येथील एतद्देशीय आदिवासी समाज मुख्य समाजापासून सर्वस्वी अलग असे कधीच राहिलेले दिसत नाहीत. त्यांनी या ना त्या प्रकारे भारतातील धर्म, कला आणि इतर सांस्कृतिक अंगांवर आपला ठसा उमटवला आहे. आदिवासी समाजातील सांस्कृतिक आविष्कार समजावून घेतल्यास आपल्याला, ज्यांचा अर्थ कालौघात लोप पावला आहे अशा काही भारतीय परंपरांच्या गूढ आणि प्रतीकात्मक अंगांचा शोध घेण्यासाठी दिशा मिळू शकेल (बोखारे : २००३, सोनावणे व गारे : १९८६) पुपुल जयकर (१९८०) यांनी भारतातील तुलनात्मक परंपरांना सतत वाहणाऱ्या नदीची उपमा दिलेली आहे. नदी म्हणजे काही केवळ वाहते पाणी नव्हे तर ते एक निसर्गाचे पवित्र उदात्त, अद्‌भुत असे इंद्रियगोचर रूप आहे. आदिवासी संस्कृतीत नदी हे जीवनदायक पोषक शक्तीचे रूपक मानले आहे. नदी आपल्या प्रवाहात सतत होणाऱ्या हालचालींमुळे जलप्रवाहाच्या पात्राला आणि काठावरच्या भूभागाला आकार देत असते. कालपरत्वे त्यात बदल घडवून आणीत असते. पण कधी कधी नैसर्गिक कारणांमुळे या पात्रात लहानमोठी बेटे तयार होतात व त्यांच्यावर प्रवाहातील बदलांचा परिणाम होत नाही. काठावरील पर्यावरणात व या बेटांवरील पर्यावरणात फरक दिसून येतो. प्रवाहाने विभागण्यापूर्वी काठावरचे व बदललेले पर्यावरण पूर्वी कसे होते याची कल्पना बेटांवरील स्थिर पर्यावरणाच्या निरीक्षणामधून येऊ शकते (बोखारे : २०००, २००३). आज केवळ भारतातीलच नव्हे तर जगभरातील सर्वच आदिवासी समाज हे मानव संस्कृतीच्या मुख्य प्रवाहातून विलग झालेल्या बेटांसारखे आहेत. त्यांच्या संस्कृतीचा अभ्यास आपल्याला आज धूसर झालेल्या एकात्म मानवी संस्कृतीच्या मुळांचा शोध घेण्यासाठी उपयुक्त ठरू शकेल. म्हणून भारतीय संस्कृती, कलाविश्व आणि सौंदर्यकल्पना समजून घेण्यासाठी भारतातील आदिवासी संस्कृती व कलाविश्व समजावून घेणे अनिवार्य आहे.

## आदिवासी संस्कृतीतील कलाविष्कार

आदिम काळापासून मानवी जीवनात कलानिर्मितीची प्रेरणा दिसून येते. पन्नास हजार वर्षांपूर्वी गुहांमधून राहणाऱ्या आदिमानवांपासून ते आजपर्यंतच्या मानवी संस्कृतीच्या वाटचालीतल्या प्रत्येक टप्प्यावर मानवाच्या कल्पनाशक्तीचा कलात्मक अविष्कार झालेला पाहायला मिळतो. त्यामुळे कलेला मानवजातीत महत्त्वाचे व मानाचे स्थान आहे. म्हणूनच प्रत्येक ज्ञात समाजात कलेचा आविष्कार दिसून येतो. कलेची उपासना मनुष्याला पशुतुल्य होण्यापासून वाचवते. म्हणून की काय आपल्याकडे 'साहित्यसंगीतकलाविहीन: साक्षात् पशु:

पुच्छविषाणहीन:' असे म्हटलेले आहे.

संस्कृतीचा इतिहास पाहता मानवी मन व सृजनशीलता यांना आकार व अभिव्यक्ती देणारा प्रमुख ऊर्जास्रोत म्हणून कलानिर्मितीची प्रेरणा काम करताना आढळते. कलेच्या निर्मितीत मानवाचे संस्कारक्षम मन प्रमुख भूमिका बजावते. बाल्यावस्थेपासूनच माणसाला पंचेद्रियांद्वारे आजुबाजूच्या गोष्टींची जाणीव होते. त्या अवलोकनाची, निरीक्षणाची प्रतिबिंबे त्याच्या मनावर उमटतात. हे अनुभव अगदी लहानपणापासून मनावर संस्कार करीत असतात व त्यातून अनुभवांचे भांडार तयार होत जाते. हे अनुभवविश्व विस्तारत जाऊन माणसाचे मन समृद्ध होते आणि ते संपृक्त झाल्यावर सत्य, शिव आणि सुंदर या निकषांना उतरलेले अनुभव मनातून प्रतिभेच्या रूपाने बाहेर पडतात. या बाहेर पडण्याच्या अवस्थेत जी निर्मिती होते ती म्हणजे कला. मग तिचे रूप कदाचित चित्र, कविता, कथा, शिल्प, नृत्य, संगीत, आकाराची रचना असे काहीही असू शकेल.

व्यक्तिगत वा सामूहिक स्तरावर होणाऱ्या कलाविष्काराच्या समाजातील इतर सामाजिक आणि सांस्कृतिक संस्थांशी आंतरक्रिया होत असतात. धर्म, तंत्रज्ञान, वैद्यक, राजकारण, अर्थव्यवस्था, विवाहपद्धती, कुटुंबरचना या व अशा इतर सामाजिक संस्थांमध्ये कलेचे अस्तित्व, सहभाग आणि कधी कधी प्रभाव आढळतो. कलेचे हे सर्वव्यापी अस्तित्व जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करते. मानवशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, कोणताही कलाप्रकार हा समाजाच्या संस्कृतीचा आविष्कारात्मक भाग (expressive part of culture) असतो. कोणत्याही समाजातील (व पर्यायाने संस्कृतीतील) आविष्कारात्मक प्रणाली (उदाहरणार्थ धर्म, कला) ही नियोजनबद्धसृजनाशी (creativity) संबंधित तर असतेच शिवाय ती त्या सृजनाचा अविष्कार (expression) आणि उपयुक्तता (tility) यांच्याशीही निगडीत असते. संस्कृतीचा आविष्कारात्मक भाग म्हणून पाहिल्यास कोणतीही कलाकृती ही त्या समाजांतील मानवी कल्पनाशक्ती व बुद्धिमत्ता यांचे दृश्य रूप असते.

म्हणून आदिवासी संस्कृतीतील कला समजावून घेण्यापूर्वी तीन घटकांचा विचार करणे आवश्यक ठरते. ते घटक म्हणजे कलानिर्मिती (creation of art),कलावस्तू (object of art) आणि त्या कलेचा रसास्वाद (appreciation of art). कलावस्तू, कलाकार आणि कलास्वाद घेणारे रसिक हे कलेचे महत्त्व व मूल्य ठरवितात. या विविध घटकांमध्ये होणाऱ्या परस्परावलंबी आंतरक्रिया समाजाचा कलेकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि सौंदर्याचे निकष ठरवितात. कलानिर्मिती आणि कलास्वाद या दोन्ही प्रक्रिया विस्तृत अशा सामाजिक - सांस्कृतिक संदर्भाच्या चौकटीत घडत असतात. आदिवासी समाजात या चौकटी घट्ट असल्यामुळे आदिवासी कलाप्रकारात वैविध्य आणि विपुलता दिसून येते. रेखाचित्रे, रंगचित्रे, शिल्प, कोरीव कुसर या ललित कला (fine arts), नृत्य, नाट्य, संगीत, नृत्य-नाट्य, विधी-नाट्य (ritual drama)

या प्रयोगात्मक कला (Performing arts); तसेच काव्य, दंतकथा, लोककथा, मिथककथा व इतर लोकवाङ्मय या शाब्दिक कला (verbal arts) अशा अनेक प्रकारांमधून आदिवासी कलाविश्वाची व्याप्ती व पसारा दिसून येतो. प्रस्तुत लेखामध्ये ठाणे जिल्ह्यातील वारली आदिवासी जमातीच्या कलाप्रकारांच्या विशेष संदर्भात आदिवासी कलेच्या सौंदर्यशास्त्रीय व सामाजिक परिमाणांचा विचार केला जाणार आहे.

वारली आदिवासींची चित्रकला, चित्रविषय, चित्रशैली आणि ती ज्या सामाजिक - सांस्कृतिक संदर्भात आकाराला येते ते संदर्भ पाहिल्यास त्यांमधून त्यांची संस्कृती, श्रद्धा, विश्वास, दृष्टिकोन, भावभावना आणि आदर्श यांचे दर्शन घडते. ही कला म्हणजे केवळ कलेसाठी कला नाही. तीमागे एक विशिष्ट हेतु आहे. या कलेमागे सतत काहीतरी सांगण्याची उर्मी आहे. आदिवासींच्या कलाविष्कारामागे नेहमीच एक सृजनशील धार्मिक प्रेरणा आढळते. लोकांमध्ये बंधुभाव वाढीला लावण्यास तसेच त्यांचे जीवन संपन्न करण्यास आदिवासी कलेने नेहमीच हातभार लावलेला आहे. प्रतिकूल निसर्गाशी सतत झगडताना थकल्याभागल्या जीवांना हवासा वाटणारा विरंगुळा आदिवासी कला देत असतात. त्या दृष्टीने ही कला जीवनाभिमुख आहे. म्हणून वारली आदिवासींची चित्रकला ही मूलत: सौंदर्यवादी नसून उपयुक्ततावादी आहे. साधेपणा, त्यामधील सौंदर्य आणि निर्मळपणा ही आदिवासी कलेची वैशिष्ट्ये आहेत. आदिवासींचा जीवनविषयक दृष्टिकोन अगदी सरळ असल्याने त्यांची कला ही साधी असते. त्यांना सतत निसर्गसान्निध्य लाभत असल्याने निसर्गातील सुसंवादी आणि मोहक आकार त्यांना प्रेरणा देतात. कोणत्या ना कोणत्या प्रकारे होणारा कलाविष्कार हे आदिवासी संस्कृतीचे अविभाज्य अंग असल्यामुळे आदिवासी कलेच्या कक्षा काटेकोरपणे वेगळ्या करता येत नाहीत. म्हणून त्यांच्या कलांचा अभ्यास करताना आदिवासी संस्कृतीतील परंपरा, धार्मिक श्रद्धा, संगीत, नृत्य, काव्य इत्यादी संदर्भांशिवाय त्यांच्यामधील कलागुणांचे रसग्रहण करता येत नाही.

चित्रकलेशिवाय वारली आदिवासींमध्ये काव्य, संगीत, नृत्य या कलाही फुललेल्या आढळून येतात. ठाणे जिल्ह्यातील आदिवासींमध्ये अतिशय लोकप्रिय असलेल्या बोहाडा या उत्सवात आदिवासींच्या कलेचे विविध अविष्कार पाहावयास मिळतात. चैत्र-वैशाख महिन्यात, विशेषत: अक्षयतृतीयेच्या दरम्यान साजरा होणारा हा उत्सव म्हणजे विविध देवदेवतांचे मुखवटे घालून केलेले विधी नृत्य-नाट्य (ritual dance - drama) असते. या उत्सवात एकाच वेळी नृत्य, नाट्य, अभिनय, संगीत, काव्य, शिल्प (मुखवटे घडवणे), कारागिरी, हस्तकला, रंगभूषा व वेषभूषा (casturnes) अशा विविध कलांचा अविष्कार होत असतो. बोहाडा साजरा करण्याच्या पद्धती म्हणजे मुखवटे तयार करून रंगवणे, रंग व वेशभूषेतील प्रतीकात्मकता, गाणी, संहिता पारंपरिकरित्या पाळल्या जात असल्या तरी बोहाडा साजरा करणारे भोवतालच्या बदलत्या सामाजिक पर्यावरणाबद्दल अनभिज्ञ नाहीत. परंपरेनुसार चालत आलेल्या बोहाड्यातील सोंगांचे

मुखवटे हे विविध आदिवासी देव, हिंदू देवता, कौरव पांडवांसाराखे महाकाव्याचे नायक यांचे असले तरी अलीकडच्या काळात जसजसा त्यांचा नागरी व आदिवासीतर जीवनाशी संपर्क आला त्यानुसार त्यात शिवाजी, इंदिरा गांधी यांच्याही सोंगांचा व मुखवट्यांचा अंतर्भाव झाला.

आदिवासींची वास्तुकलासुद्धा निसर्गवादी आहे. म्हणून तिला पर्यावरणीय वास्तुकला असे म्हटले जाते (डेंगळे : २००३). पश्चिम किनारपट्टीवरच्या बहुतेक आदिवासींची घरे खिडक्या, पक्क्या भिंती नसलेली, झावळ्यांची छप्परे असलेली आणि अंधारी असतात. आदिवासी वास्तुकलेत माणूस व निसर्ग यांच्यामधील घनिष्ठ नाते दिसून येते. आपल्याला हवे तेवढेच घ्यायचे, बाकीचे तेथल्या तेथे ठेवायचे हे पर्यावरणवादी तत्त्व व त्याबरोबरच मन, हात आणि भोवतालच्या परिसरातील सामग्री यांना एकत्रित आणणारी प्रक्रिया आदिम संस्कृतीत जाणवते. तिचे प्रकट रूप त्यांच्या वास्तुकलेत दिसते. घर आखताना आणि बांधताना विविध प्रसंगी करावयाच्या विधींमधून आदिवासी संस्कृतीत व वास्तुकलेतून व्यक्त होणारी व्यामिश्र मिथके, जगाच्या उत्पत्तीच्या संकल्पना, निसर्ग व देवता, जमीन, पाणी, प्रकाश, अवकाश या सर्वांना एकत्र सांधणारे प्रतिसाद दिसून येतात.

## आदिवासी संस्कृतीतील कलेचे महत्त्व व स्थान

आदिवासी कला या काही ठराविक संदर्भातच अर्थपूर्ण ठरतात. आपल्या विविध कलांकडे आदिवासी लोक केवळ कला म्हणून अथवा मनोरंजनाचे साधन म्हणून बघत नाहीत तर त्या त्यांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनातील आवश्यक घटक आहेत. त्यामुळे आदिवासी संस्कृतीत कलेला सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे आदिवासी संस्कृती बहुधा बंदिस्त समाजात आकार घेते. त्यामुळे सामूहिकतेला जास्त महत्त्व प्राप्त होते. म्हणूनच जगभरातल्या बहुतेक सर्व आदिवासी समाजांमध्ये कुळे, कुळचिन्हे, कुळांची ठराविक प्रतीके (totems) यांना फार महत्त्व असते. आदिवासींच्या समाजरचनेतून व सांस्कृतिक चौकटीतूनच त्यांना आचार व विचार संहिता मिळत असल्यामुळे त्यांच्या समाजाचा भाग असलेल्या व सांस्कृतिक संदर्भात फुलणाऱ्या कलाच त्यांच्या आचार-विचारांना दिशा देतात. त्यातूनच त्यांना जगण्याचे संदर्भ व नीतिमूल्ये मिळतात. त्यामुळेच त्यांच्या जीवनात अंतर्भूत असलेल्या कला त्यांना असणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक मूल्यांनी अर्थपूर्ण ठरतात. उदाहरणच पाहायचे झाले तर वारली घरांमध्ये जे मुठीचे ठसे उमटवितात. त्याला कला वा सौंदर्यदृष्टीने फारसे कौशल्य व महत्त्व नाही. परंतु ज्या पिकांवर वर्षभर गुजराण करावयाची त्याचे प्रथम ऋण मानून मगच त्याचा उपभोग घ्यायचा ही त्यामागची भावना हृद्य तसेच उच्च सामाजिक - नैतिक पातळी दर्शविणारी आहे.

आदिवासी कला म्हणजे अतिप्राचीन काळापासून तो आजपर्यंत आपल्यापर्यंत सतत वाहात आलेला एक जिवंत स्रोत आहे. अजूनही तो आदिवासी लोकजीवनाचा अविभाज्य भाग

आहे. बऱ्याच वेळा आदिवासी कला ही विशेषत: स्त्रियांची सामूहिक कृती असल्याचे दिसून येते. ही कला एक प्रकारे समाजातील कमकुवत स्तरावरील घटकांशी निगडीत आहे. कमकुवत स्तरावर असल्याने कधी कधी शोषण, सामाजिक अन्याय वाट्याला आल्यामुळे या कलेची स्वत:ची अशी वेगळी मनोरचना बनलेली आहे. पर्यायाने धार्मिक विधी हे तिचे प्रमुख अधिष्ठान होऊन बसले आहे.

## आदिवासी कलाविष्कारामधील सौंदर्यानुभव

कोणतीही कलाकृती ही मानवी अनुभवविश्व, कल्पनाविश्व व भावविश्वाचे अंश निवडून त्यामधून अंकुरते. त्यातून निर्माण होणाऱ्या कलावस्तूंमधून ती पाहणाऱ्यामध्ये (किंवा ऐकणाऱ्यामध्ये) विशिष्ट संवेदना व मूल्यमापन उभरतात. या भावस्फुरणालाच आपण सौंदर्यास्वाद म्हणतो. आदिवासी कलेचा सौंदर्यास्वाद घेताना एक गोष्ट प्रामुख्याने जाणवते की, नेहमीच सर्जनशील, धार्मिक प्रेरणा व सतत काहीतरी सांगण्याची ऊर्मी असते. या व्यतिरिक्त आदिवासी कलेचा उपयोग जमातीच्या रूढी, परंपरा, वाङ्मय, लोकइतिहास हा पुढच्या पिढ्यांपर्यंत संक्रमित करण्यासाठी केला जातो. या कला त्यांच्या संस्कृतीतून, जीवनशैलीतून उमलून आलेल्या आहेत. त्यांच्यावर बाह्यप्रभाव फारसा नाही. त्यांची निर्मिती छंद वा व्यवसाय म्हणून झाली नाही; तर आदिवासी संस्कृतीत जीवनातले सौंदर्य टिपून त्याचे उपयुक्ततेत रूपांतर करण्याची निसर्गत:च आलेली जी ओढ आहे. तीमधून आदिवासी कलाविश्वाची निर्मिती झालेली आहे. म्हणूनच की काय पण, जवळजवळ सर्वच आदिवासी समाज हे त्यांच्या अतिशय दुर्बल / निर्बल अशा अर्थव्यवस्थेचे बळी असले तरी त्यांच्या कल्पनाशक्तीचा व सृजनशीलतेचा पल्ला अतिशय समृद्ध व संपन्न आहे.

आदिवासींची कल्पनाशक्ती निसर्गाभोवती फिरते आणि त्यामधून निर्मितीसाठी ऊर्जा मिळवते. तरीसुद्धा त्यांची कलानिर्मिती म्हणजे निसर्गातील वास्तवाची मानवनिर्मित नक्कल नसते तर ती एक समांतर वास्तवाची (parallel reality) ची निर्मिती असते (या समांतर वास्तवाची जास्त चांगली कल्पना राठवा भिल्ल आदिवासींची पिठोरा चित्रे व सावरा आदिवासींच्या पूर्वजांसाठी काढलेल्या घरांच्या चित्रामधून घेऊ शकते.) या समांतर वास्तवाची कल्पक निर्मिती केवळ सांस्कृतिक व सामाजिक परंपरांवर असलेल्या दृढ श्रद्धा व गाढ विश्वास यामुळेच होऊ शकते. सांस्कृतिक परंपरांवरील हा विश्वास व श्रद्धा त्यांच्या जीवनावरील विश्वासाला भक्कम पाया - मूलाधार - देतो. कलानिर्मिती म्हणजे मानवी भावजीवनात जे जे अमूर्त, अदृश्य आहे. त्याला मूर्तरूप देण्याचे प्रयत्न असतात. हे प्रयत्न आदिवासींच्या आंतरिक सर्जनशीलतेला प्रेरणा व ऊर्जा पुरवितात. आणि त्यामुळे दुर्भिक्ष्य, दारिद्र्य, शोषण, सामाजिक विषमता, अन्याय अशा अनेक अडचणींनी गांजलेले असले तरी आदिवासी जीवनाभिमुख राहून त्यातले सौंदर्य टिपण्याचा प्रयत्न करतात. रोजच्या जगण्यातले कठोर वास्तव विसरण्यासाठी आदिवासींची प्रतिभा त्या

वास्तवातून काल्पनिक जगात झेप घेते आणि कलेच्या आविष्कारातून सुबत्ता, सौख्य, आनंद असलेल्या चित्रमय वा इतर कलामय जीवनाची पुर्ननिर्मिती करते. म्हणजे एकप्रकारे पाहता आदिवासी कला म्हणजे जणू काही जीवनातल्या कुरूपतेकडे हसून दुर्लक्ष करण्याचा, पण जीवनातले सौंदर्य टिपण्याचा प्रयत्न आहे.

आदिवासी कलाविष्कार हे सहसा केवळ मनोरंजनासाठी किंवा व्यक्तिगत सुखवादी - अनुभवांसाठी (hedonistic experiences) असल्याचे दिसत नाही. मानवी मन काही फक्त पंचेंद्रियांद्वारेच जगाचा अनुभव घेत नाही तर त्याला भावनिक बाजूही असते. बरेचसे आदिवासी कलाप्रकार हे गाढ सखोल अशा आत्मिक, आध्यात्मिक अनुभवांतून स्फुरलेले असतात (उदाहरणार्थ, भगतांकडून रेखाटले जाणारे चौक, राठवा भिल्लांची चित्ररूपातील पिठोरा पूजा, सावरा आदिवासींच्या भगतांची चित्रकला, अंगात संचार झालेल्या अवस्थेतील नृत्य - नाट्ये, कातकरी; ठाकर लोकांच्या ढोलीयांचे ढोलवादन, इ. इ.) त्यांना कलानिर्मितीच्या प्रेरणा कधी स्वप्नात मिळतात तर कधी दृष्टांतामधून मिळतात, तर कधी त्या मनाच्या भारलेल्या संचारी अवस्थेत नेणीवेच्या प्रांतातून धार्मिक प्रेरणांचे रूप घेऊन येतात.

कलेबद्दलच्या पाश्चात्य विचारामध्ये कला ही व्यक्तिगत कल्पना उस्फूर्तपणे मांडण्याची पद्धत असल्याचे मानले आहे. भारतीय पूर्वसूरींनी मात्र कला ही व्यक्ती आणि समाजाच्या दृष्टीने उपयोगी पडण्याची पद्धत असा विचार मांडला आहे.

भारतीय परंपरेनुसार जी कला भोगाकडे प्रवृत्त करते ती खरी कला नव्हे; तर जी कला परमानंदात लीन करते तीच खरी कला होय. खरी कला केवळ इंद्रियांच्या आनंदासाठी नसून तिचा उद्देश आत्मिक समाधानाचा असतो म्हणून 'स्वत:ची कल्पना मांडणे, स्वत:ला अभिव्यक्त करणे' (Expression of self) पेक्षा 'स्वत:ला स्वत:पासून दूर नेऊन स्वत:मधील दिव्यत्व व्यक्त करणे' (Expression of divine) या विचाराला भारतीय कलांमध्ये प्राधान्य मिळाले. (Expression of divine चे तत्त्व आपल्याला सर्व अभिजात नृत्यकलांमधून-भरतनाट्यम्, कथकली, कुचिपुडी, इ. तसेच पारंपरिक चित्रशैली, मंदिर शिल्पे, भक्तिकाव्य, अभिजात संगीत इ. मधून प्रतिबिंबित झालेले दिसते). योगी अरविंदांनी म्हटल्याप्रमाणे ''भारतीय कलानिर्मितीचे मूळ हे अंतर्ज्ञानातून निघणारे असून ते व्यक्तीच्या धार्मिक, आध्यात्मिक भावनांशी मिळालेले आहे. .... आणि त्याचे सर्वांत महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे व्यक्तीच्या स्व-मधील जे अनंत आहे, दैवी आहे ते व्यक्त करणे हे होय'' (दहेजिया :१९९६) भारतीय कलापरंपरांचे मूळ जर आपण आदिवासी संस्कृतीत शोधू लागलो तर आपल्याला असे दिसेल की आदिवासी कलाकार आपल्या कलानिर्मितीच्या माध्यमातून स्वत:तले दैवीपण व्यक्त करत असतो व त्याद्वारे निसर्गाशी अद्वैत साधत असतो.

या अद्वैतामधूनच निसर्ग आदिवासींना कलानिर्मितीच्या प्रेरणा देत असतो. निसर्गाच्या

सान्निध्यात राहणारे आणि त्याच्याशी हरप्रकारे जवळीक साधणारे आदिवासी कळत न-कळत निसर्गाचे निरीक्षण करीत असतात आणि जाणता - अजाणता त्यामधील सौंदर्य आत्मसात करीत असतात. याप्रकारे आत्मसात केलेल्या कल्पना त्यांची सौंदर्याची जाणीव दृश्यरूपात सादर करायला मदत करतात. निसर्गाच्या प्रेरणा सर्वच आदिवासींना सारख्याच प्रकारे मिळत असतात. पण बदलत्या पर्यावरणामुळे त्यांच्या अविष्काराचे, अभिव्यक्तीचे बाह्यरूप बदलले. सुसूत्रता, सरळ रेषा व वळणे यामधील सामंजस्य, त्यांचे एकीकरण व संयोग, आकारांमधील प्रमाणबद्धता आणि या सर्वांमधील समतोल हे निसर्गाचे मूळ वैशिष्ट्य आहे. जगभरातल्या सर्व प्राचीन आदिवासी संस्कृतीतल्या कलाविष्कारात ही वैशिष्ट्ये आढळतात. म्हणूनच तर भूमितीचे सिद्धांत माहिती होण्याच्या कितीतरी अगोदर भौमितिक आकारांमधले रचनासौंदर्य आदिवासी मानवसमूहांनी प्रकट केले आहे. भारतातील वारली, सावरा, भिल्ल, गोंड इ. आदिवासींची चित्रकला, गुजराथमधील आदिवासींचे कशिदाकाम, ऑस्ट्रेलियातील अबोरिजीनल्स, न्यूझीलंडमधील माओरी यांची चित्रकला, अमेरिकेतील मूळ रहिवासी, कॅनडाच्या पॅसिफिक किनाऱ्यावरील आदिवासींची चित्रे व काष्ठशिल्पे आणि मुखवटे अशी असंख्य उदाहरणे यासाठी देता येतील.

निसर्ग आणि जीवनाबद्दलचे प्रेम ही आदिवासी संस्कृतीची स्वाभाविक वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या जीवनावर निसर्गाचे प्रतिकूल परिणामही होत असतात. तरीसुद्धा निसर्गातल्या जीवनातल्या सौंदर्याला प्रतिसाद देण्यास ते नेहमी तत्पर असतात. या प्रतिसाद देण्याच्या प्रवृत्तीमुळे वारली आदिवासींच्या घरांच्या भिंतींवर समृद्ध, संपन्न निसर्गाची आणि आनंदी, स्वच्छंदी, कृतिशील जीवनाची विविध रूपे चित्रित केलेली आढळतात. आपल्या हालचालींमधून जिवंत, लयबद्ध सळसळ दाखवणारी वारली चित्रांमधली वनस्पतिसृष्टी आणि वादन, नर्तन करणारे स्त्रीपुरुषांचे समूह, बोहाडा विधिनाट्याचे सादरीकरण, तारपा संगीताच्या तालावर होणारे गतिमान पण अतिशय लयबद्ध पदन्यास हे पाहिले की, त्यांच्या कल्पनाशक्तीच्या तरलतेने, संवेदनाशीलतेने आणि सौंदर्यलालसेने मन विस्मयचकित होते आणि पटते कि आदिवासी कलाविष्कार म्हणजे जीवनातल्या तसेच निसर्गातल्या - आणि ऐहिक तसेच दैवी - सौंदर्याचे चित्रण होय !

## आदिवासी कलेची सौंदर्यशास्त्रीय परिमाणे

हेन्री मूरच्या मतानुसार कलेच्या सर्व प्रकारांचे मूळ हे माणसाच्या आदिमतेत आहे. आदिवासी कलेचे स्वरूप आणि सौंदर्यकल्पना समजून घ्यायच्या असतील तर आदिवासी कलेचे आदिमपण, त्यांचा जिवंतपणा, त्यातील सामर्थ्य आणि भावनांना आवाहन करण्याची त्यांची ताकद या गोष्टी अगोदर समजून घ्यायला हव्यात. आदिवासी कला म्हणजे मानवाला संस्कृतीच्या उष:काली पंचमहाभूतांबद्दल, निसर्गाबद्दल वाटलेले भयचकित कुतूहल, नवल, विस्मय, भयादर, आशा या सर्वांचे प्रतिबिंब आहे. निसर्गाला समजावून घेण्याचा तो एक प्रयत्न आहे. उत्क्रांतीच्या

सुरूवातीच्या काळात मानवाला निसर्गाची जी विविध रूपे दिसली, जीवनात जी विविधता जाणवली, त्यातली जीवनातील जी घटिते अनाकलनीय वाटली, त्या सर्वांना सुसूत्र रूपात मांडण्याचे प्रयत्न आदिवासी कलांमधून, चित्रांमधून व्यक्त होतात. ही चित्रे व इतर कलाप्रकार म्हणजे आपल्या आदिम पूर्वजांची, अनुभवांना प्रतीकरूपे देऊन त्यांना अर्थ चिकटवून त्याद्वारे, विश्वरचना समजून घेण्याचे प्रयत्न आहेत.

आदिवासींनी घरात वा भिंतींवर काढलेली चित्रे म्हणजे केवळ विशिष्ट आकार नाहीत तर त्यांना त्या त्या समाजात विशिष्ट असे परंपरागत प्रतिकात्मक अर्थ आहेत. ज्या संस्कृतीतून ते आले ती संस्कृती समजून घेण्याचे मार्ग आहेत. त्या त्या समाजांमधल्या परंपरागत वैश्विक जाणिवांची आणि स्वाभाविक संवेदनांची पुनर्रचना करण्याचे प्रयत्न आहेत. चित्ररूपातील या सर्वसमावेशक, सर्वग्राही रचना व आकृतिबंध म्हणजे मानवामध्ये निसर्गत:च असलेली जी सत्य, शिव व सुंदराची ओढ आहे तिचे कालातीत असे दृश्य रूप आहे.

या चित्रांमधली प्रतीकात्मकता व तिचा कलानिर्मितीशी आणि सौंदर्याच्या जाणिवेशी असलेला संदर्भ समजावून घेणे म्हणजेच आदिवासी कलेची सौंदर्यमीमांसा. संदर्भहीन प्रतीके अर्थशून्य किंवा अपूर्ण तरी ठरतात. याचे कारण म्हणजे ज्या संदर्भात कलेची निर्मिती होते, तिचे मूल्य ठरवले जाते व कलास्वाद घेतला जातो ते सांस्कृतिक संदर्भ कलेतील सुप्त, धूसर, अदृश्य अर्थाला स्पष्ट रूप देतात आणि प्रतीकांमध्ये प्राण भरतात. म्हणून आदिवासी कलांचे सौंदर्य त्यांच्या सांस्कृतिक व सामाजिक संदर्भातच केले पाहिजे.

आदिवासी स्वत: त्यांच्या सौंदर्यरचनांकडे कला म्हणून अथवा मनोरंजनाचे किंवा सौंदर्यानुभूतीचे साधन म्हणून पाहात नाहीत. तरीसुद्धा या कला त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य भाग आहेत. त्यांची समाजरचना त्यांच्या कलाप्रकारांना सामाजिक चौकट व सांस्कृतिक महत्त्व पुरविते. त्यामुळे आदिवासी कलांमधून त्यांच्या सामाजिक जाणिवा आणि सांस्कृतिक मूल्ये प्रतिबिंबित झालेली दिसून येतात. त्यांच्या पारंपरिक कलांमधून समूहमनाचाच आविष्कार होत असतो. या आविष्कारात समाजातील रूढी, धार्मिक आचार, मंत्रतंत्रात्मक यातुक्रिया इत्यादी विविध जीवनांगांचा समावेश असल्यामुळे त्या सामूहिक जीवनाचाच एक भाग असतात. त्यांच्यामागे धार्मिक, आधिभौतिक हेतु असल्याने त्या पुन्हापुन्हा निर्माण केल्या जातात आणि मग त्यांना विधीचे रूप येते. आणि हे विधी सामाजिक जाणिवा, नैसर्गिक परिस्थिती आणि सांस्कृतिक मूल्ये यांच्याशी घट्ट बांधली जातात. या दृष्टीने पाहता आदिवासी संस्कृतीतील सामाजिक व सौंदर्यशास्त्रीय परिमाणे एकमेकांत मिसळून गेलेली दिसतात.

उदाहरणार्थ, वारली आदिवासींच्या चित्रांमधून (तसे पाहता भारतातील सर्वच आदिवासी जमातींच्या चित्र वा रंगकलेतून) रचनेचे महत्त्व आणि आकारांची नयनमनोहरता तर असतेच

पण जेव्हा आपण आदिवासी समाजातील बालमृत्यूंच्या मोठ्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर त्यांची प्रजननाबद्दलची आस व काळजी समजावून घेऊ तेव्हा आपल्याला चौक आणि पाचवीच्या चित्रांतला अर्थ अधिक चांगल्या प्रकारे उमजेल.

## आदिवासी कलेची सामाजिक परिमाणे :

आदिवासी संस्कृती व त्यातील सौंदर्यकल्पना यांचा अभ्यास करताना ज्या सामाजिक चौकटीत व सांस्कृतिक संदर्भात कलेची निर्मिती व तिचा उपयोग होतो त्यावर लक्ष केंद्रित करावे लागते. त्यामुळे आदिवासी संस्कृतीची सौंदर्यशास्त्रीय व सामाजिक परिमाणे समजून घेण्यासाठी मानवशास्त्राच्या (anthropology) सर्वसमावेशक सर्वसमन्वयी (holistic) दृष्टिकोनाचा व पद्धतींचा अवलंब करावा लागतो. म्हणजे वारली चित्रांमधले सौंदर्य आकलन करून घ्यायचे असेल तर त्यांच्या तारपा नृत्यामधील पदन्यास, लय तसेच त्यांचे लोकवाङ्मय, दैवकल्पना, पारंपरिक श्रद्धा,लग्न, कुटुंबसंस्था याविषयीच्या कल्पना, सामाजिक नीतिमूल्ये यांची माहिती असणे आवश्यक ठरते. त्याच्या साह्याने समाजात संस्कृतीत होणारे बदल जास्त चांगल्या प्रकारे टिपता येतात.

आदिवासी कलाप्रकारांसाठी दृढ सामाजिक वा सांस्कृतिक बंधने असली तरी त्या कला परंपरागत प्रतीकांमध्ये आणि साचेबद्ध चित्रणात अडकून स्थिर, अचल झाल्याचे दिसत नाही. आज दिसणाऱ्या वारली चित्रांमधून त्यांच्या समाजात होणाऱ्या बदलांचे प्रतिबिंबही दिसते. काही वारली चित्रांमध्ये बस, आगगाडी, जत्रेतले पाळणे, मोटारी या गोष्टीही काढलेल्या दिसतात. याशिवाय कधी कधी स्वस्तिक, ओम, चौकाच्या बाजूला लिहिलेले 'शुभ-लाभ' हे सुद्धा सहजगत्या आल्यासारखे आढळतात. तरीसुद्धा पारंपरिक आकृतिबंध, त्यांचे प्रतीकार्थ व शैली मूळच्या विशुद्ध स्वरूपात जपलेले दिसतात. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या कलांना समाजात असलेले सांस्कृतिक मूल्य. हे कलाप्रकार लोकांच्या भावजीवनाशी जोडलेले असल्यामुळे भावनांना आवाहन करणाऱ्या नवीन प्रतिमांचा स्वीकार करून त्या पारंपरीक रचनांमध्ये गुंफल्या जातात. नवीन प्रतिमा जुन्या प्रतीकांशेजारी मांडल्या तरी जुन्या आकृतिबंधाचे महत्त्व कमी वा नष्ट होत नाही. हे बदल एखाद्या व्यक्तीकडून होत असतील पण समाजातील इतर लोकही त्याचे परीक्षण करतात व बदल मान्य करतात वा नवीन बदल सुचवतात. म्हणजे सामुदायिक मान्यता असेल तरच पारंपरिक संस्कृतीतला बदल स्वीकारला जातो.

वारली लग्नाच्या वेळी गाणीही गायली जातात. लग्न होणारे वधूवर, सासरचे नातेवाईक इत्यादींना उद्देशून ही गाणी असतात. मुख्यत: उपदेशपर असलेल्या या गाण्यात लग्नाआधीची परिस्थिती व लग्नानंतर बदलणारी परिस्थिती यांचे वर्णन असते आणि बदललेल्या परिस्थितीत कसे वागावे याचा उपदेश असतो. लग्नाशिवाय होळी, दिवाळी या सणांची आणि तारपा नाचाच्या वेळी गायचीही गाणी असतात. समाजात, संस्कृतीत होणारे बदल गाण्यांमधूनही व्यक्त होतात.

जुन्या गाण्यांबरोबर नवीन गाणीही म्हटली जात असली तरीसुद्धा पारंपारीक गाण्यांचे महत्त्व कमी होत नाही किंवा ती विस्मृतीतही जात नाहीत. पण ही गाणी कुणी रचली असे विचारले तर 'गावातल्या सर्वांनी मिळून' असेच उत्तर मिळते. यमक जुळवण्यात, काव्य करण्यात विशेष गती असलेली एखादी व्यक्ती नाचता नाचता चटकन नवीन रचना करते पण त्यात सामुदायिक फेरबदल करूनच मग ती रचना स्वीकारली जाते. म्हणजे आदिवासी संस्कृतीत कलाकार व त्याची निर्मिती या दोघांकडेही विशेष व्यक्ती वा बाब म्हणून पाहिले जात नाही तर दोघेही समाजाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. याचे कारण म्हणजे कला, कलाकार व कलेचा उपयोग वा आस्वाद तिन्ही घटकांपेक्षाही त्यांच्याशी जोडलेले सामाजिक महत्त्व, सांस्कृतिक मूल्य जास्त महत्त्वाचे मानले जाते. आणि या सामाजिक मूल्यांच्या बांधिलकीमुळेच वारली आदिवासींची चित्रकला बदलत्या कालौघातही अजून टिकून आहे.

वारली चित्रकलेच्या मुळाशी वारली संस्कृती व त्यांचे मौखिक वाङ्मय आहे. त्यांच्याशी वारल्यांच्या समाजधारणा, नीतिनियम, एकमेकांना घट्ट जोडलेले आहेत. वारली कला आणि थाळा लावणे, कणसरी कथा, नारळावत कथा, वाघ्या खंड, काशीखंड, रामखंड, बळीराजाची कथा तसेच त्यांची विविध गीते, नृत्यप्रकार यामागील दंतकथा या सर्वांचे एकमेकांशी सहजीवनाचे नाते आहे. थाळा लावणे हा आदिवासींमधला कथा-काव्य प्रकार आता जवळजवळ नाहीसा होत चालला आहे. काशाच्या थाळीला मेण लावून त्यावर अंबाडीचे कांडे लावले जाते आणि त्याचा वाघासारखा उपयोग करून भगत अथवा क्वचित् एखादा जाणता माणूस कहाणी सांगतो. दिवसभराच्या काबाडकष्टानंतर रात्री घरी परतल्यावर थाळा लावण्याचा कार्यक्रम होतो. या थाळ्याच्या कहाण्यांमधून सामाजिक एकोप्याचे महत्त्व, समाजासाठी करावयाचा त्याग, माणसे व निसर्गाचे एकरूपत्व, पशुपक्षी, झाडेवेली यांचे रक्षण का व कसे करावे याबद्दलच्या कथा भगत यावेळी सांगत असतो.

ठाणे जिल्ह्यात प्रामुख्याने वारली आदिवासी राहात असले तरी कोकणा, ठाकूर, कातकरी, मल्हारकोळी या इतर आदिवासी जमातींशी त्यांचे दृढ सहजीवी नाते आहे. त्यामुळे या विविध संस्कृतीमध्ये सामाजिक फरक असले तरी बरेचसे सांस्कृतिक साम्य आहे. त्यामुळे त्यांच्यामधील रीतीरिवाज परंपरा, काही कलाप्रकार, मौखिक वाङ्मय यात समानता दिसून येते. कणसरी ही या सर्वांची अन्नदेवता. कणसरी कथेतून अन्नाचा नाश करू नये, एखाद्याच्या घराला, अन्नसाठ्याला आग लावू नये, निसर्गातले पशुपक्षी, झाडे यासंबंधीचे आपले कर्तव्य अशी नीतिमूल्ये गोष्टीरूपाने सांगितली जातात. नारळावत कथा व वाघ्याखंड या कथा रात्री सुरू होऊन पहाटेपर्यंत चालतात. त्यामधील पात्रांचा आदिवासी जीवनाशी फार जवळचा संबंध आहे. काशीखंड हे मौखिक वाङ्मय काव्यरूप आहे. मृत व्यक्तीचे और्ध्वदैहिक करताना म्हटले जाणारे हे काव्य वारली व इतर आदिवासी समाजाचा अविभाज्य भाग आहे. रामखंड ही आदिवासींच्या दृष्टिकोनातून

सांगितलेली रामायण कथाच आहे. या कथेतील नियम, शिष्टाचार, नैतिक कल्पना या बहुसंख्य वारली, कोकणा, ठाकर, कातकरी, मल्हारकोळी लोकांकडून अजूनही काटेकोरपणे पाळल्या जातात. या वाङ्मयानुसार जन्म, विवाह आणि मृत्यू हे आदिवासी जीवनातले तीन टप्पे मानले जातात. त्यापैकी विवाह हा सर्वांत महत्त्वाचा धार्मिक विधी मानला जातो. या तिन्ही टप्प्यांवर केले जाणारे रीतीरिवाज आदिवासी जीवनातले सर्वांत महत्त्वाचे संस्कार मानले जातात. रामखंडात हे सर्व संस्कार सांगितलेले आहेत. सतत दुसऱ्यांचा, पर्यायाने समाजाचा विचार करा. त्यांच्याविषयी दयाभावना ठेवा व त्यांच्यासाठी त्याग करा ही रामखंडातली मध्यवर्ती कल्पना आहे. आदिवासींच्या दिनचर्येवर रामखंडाचा मोठा प्रभाव आहे. सध्या मात्र हे कथा - काव्य लोप पावण्याच्या मार्गावर आहे.

## उपसंहार

आदिवासी संस्कृतीतील कलाविश्व आणि त्यांच्याशी निगडीत असलेली सौंदर्यशास्त्रीय व सामाजिक परिमाणे समजावून घेण्यासाठी आपण प्रामुख्याने वारली संस्कृतीतील काही कलाप्रकारांचा अगदी थोडक्यात आढावा घेतला. ही परिमाणे मानवी जीवनातील कलांचे, संस्कारांचे श्रद्धेचे महत्त्व विशद करतात. मुळात कोणत्याही संस्कृतीच्या जडणघडणीत मानवी जीवनातील स्वास्थ्य, सौंदर्य व गतिशीलता राखली जावी, ती वर्धिष्णू व्हावी ही प्रेरणा असतेच. विविध मानवी व्यवहारांना सामाजिक अधिष्ठान प्राप्त व्हावे यासाठी सामाजिक नीती व मूल्यकल्पनाही अस्तित्वात येत असतात. पण आज झपाट्याने घडणारे सामाजिक बदल, शहरीकरण, नागरीकरण, जागतिकीकरण इ. प्रक्रियांमुळे आज मानवी संस्कृतीच्या वाटचालीत फार मोठे बदल वेगाने घडून येत आहेत. वेगवान सामाजिक-सांस्कृतिक बदलाच्या या संधिकाळात व्यक्ती आणि समाज म्हणून आपले अस्तित्व व अस्मिता टिकवण्याची ठाम गरज आहे, आणि ही गरज भागवण्यासाठी अविरत ऊर्जा मिळविण्याची आवश्यकता आहे. जीवन जगण्यासाठी, जीवनातले सौंदर्य टिपण्यासाठी लागणारी ऊर्जा लोक कुठून आणतात ? आदिवासींसारखे अशिक्षित, निर्मळ अर्थव्यवस्था असलेले, शोषण - सामाजिक अन्यायांचे बळी असलेले लोक जीवनाभिमुख कलाविष्कार कसा काय करू शकतात ? दैन्य, दारिद्र्यात पिडलेली, दिवसभर शेतात, जंगलात राबराब राबतात आणि रात्री घरी परतल्यावर रात्र रात्र धुंद होऊन नाचतात, गाणी रचतात, प्रसंगानुरूप सौंदर्यपूर्ण चित्रे काढतात. ही शक्ती त्यांना मिळते कुठून ? रोजच्या जीवनातले सर्व त्रास, कष्ट, अन्याय विसरून रोज सकाळी नव्याने जीवनाला सामोरे जाण्यासाठी लागणारी ऊर्जा त्यांना कुठून मिळते ? या प्रश्नांचा शोध घेतला असता समजते की, कला, नृत्य-संगीत, यांना आदिवासी संस्कृतीत परंपरागत धार्मिक महत्त्व आहे. या परंपराच आदिवासींना प्रचंड ऊर्जा पुरवतात.

आज आदिवासींच्या या ऊर्जा-पुरवठ्याचे अस्तित्व किती काळ टिकेल याबद्दल साशंकता

निर्माण झाली आहे. वारली आदिवासींची चित्रकला पवित्र व दैवी रेखाटण मानले जाते. प्रत्येक चित्र पूजनीय असते. चित्र काढणे म्हणजे जीव घडवले अशी, त्यांची भावना असल्याने प्रत्येक चित्र हे एक सेंद्रिय (organic) अस्तित्व असते. परंतु बाजारीकरणामुळे, आर्थिक प्रलोभनामुळे आज या कलेचे व्यापारीकरण होत आहे. पुण्या-मुंबईसारख्या शहरात तर वारली शैलीतील चित्रे काढायला शिकवण्याचे अनेक क्लासेस आहेत. कल्याणच्या भास्कर कुलकर्णी या चित्रकाराने ऑल इंडिया हँडीक्राफ्ट व हँडलूम बोर्डाच्या वतीने काम करताना १९७० च्या दशकाच्या शेवटी वारली चित्रशैली लोकांसमोर आणली. बघता बघता ती लोकप्रिय झाली. जिवाजी सोमा मसे सारख्या वारली चित्रकारांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. अगदी अलीकडे म्हणजे १९९५ सालात ठाणे जिल्ह्यातल्याच शांताराम तुंबडा या चित्रकाराच्या चित्रांची आंतरराष्ट्रीय चाळणीतून निवड होऊन फ्रान्समधल्या लिऑन शहरातल्या कलाविद्यालयाच्या इमारतीच्या भिंतीवर त्यांचे रेखाटन झाले. पण हे अपवादच म्हणावे लागतील. आज वारली चित्रकला आणि तिच्यामुळे मिळणारा आर्थिक फायदा बऱ्याचदा आदिवासीतर लोकांनाच होतो. या कलेला मिळालेली प्रसिद्धी आणि कमी श्रमात मिळणारा जास्त मोबदला यामुळे या कलेचा जो बाजार झाला आहे. त्याबद्दल संदीप भोईर या वारली कलाकाराने उद्विग्नतेने जी खंत व्यक्त केली आहे त्यातून या कलेचे जे अवमूल्यन होते आहे त्याची कल्पना येऊ शकते (लोकमुद्रा, २९ ऑगस्ट २००४). त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, कुणीही उठून आदिवासींची चित्रकला शिकू शकतो, विकू शकतो पण एखाद्या आदिवासीला अभिजनांची चित्रकला शिकायची असेल तर त्याला ती शिकवणाऱ्या संस्थेत प्रवेश घेण्यासाठी किमान पात्रतेचे व इतर अनेक नियम आणि खर्चाच्या बाबी अडथळा आणतील, असे का ? हा प्रश्न रास्त आहे पण त्याचे उत्तर देणे मात्र आज कुणालाही शक्य होईल, असे वाटत नाही.

आज आदिवासी संस्कृतींचा अभ्यास करताना कलेपासून ते त्यांच्या पारंपरिक हक्कांसंबंधी (जंगल, जमीन व पाणी यावरील) कोणतीही बाब घेतली तरी त्यांच्या मुळाशी आदिवासी संस्कृतीवर आक्रमण करणाऱ्या सामायिक (common) प्रक्रिया दिसतात. त्या म्हणजे आदिवासी समाज व संस्कृतीवर येणारे मुख्य प्रवाहाचे (main stream) वा वर्चस्ववाद्यांचे दडपण, जंगल व जमिनीच्या व्यापारीकरणाच्या पार्श्वभूमीवर हस्तकौशल्याच्या परंपरांचे विघटन, त्यांच्या कलांचे व्यापारीकरण आणि सुधारित तंत्रज्ञानामुळे होणारे अढळ नागरीकरण आणि या सर्वांच्या रेट्यामुळे सर्जनशील आकांक्षा गारद होण्याची निर्माण झालेली भीती. आज प्रचलित असलेल्या विकासाच्या अर्थकेंद्री कल्पना, बाजारपेठी तत्त्वांना असलेली प्रतिष्ठा, पर्यावरणाचा असमतोल यामधून मानवी संस्कृतीच्या भवितव्याविषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पर्यावरणाच्या समस्यांनी गंभीर रूप धारण केल्यावर तर आपले पर्यावरणाशी आणि पर्यायाने - स्वत:शी व समाजाशी - असलेले नाते, जीवनशैली परत तपासून पाहाणे निगडीचे आहे. सतत

वाढणाऱ्या या ताणाला तोंड देण्यासाठी, त्यावर मात करून जीवनाभिमुख होण्यास सक्षम होण्यासाठी आज आपल्याला ऊर्जेची, शक्तीची गरज आहे. ही गरज भागवण्याचे मार्ग कदाचित आपल्या आदिवासी संस्कृतीच्या अभ्यासातून मिळू शकतील. त्यासाठी मूळ आदिवासी संस्कृती व तीमधील विविध कलाविष्कार यांचे जतन आणि संवर्धन होणे आवश्यक आहे. अज्ञान, दारिद्र्य, रोगराई, शोषण यांनी पिडलेल्या आदिवासींची अस्मिता जागृत करण्याचे, त्यांना आत्मभान देण्याचे काही प्रयत्न सुरू आहेतच. पण त्यांना विश्वासात न घेता, त्यांची संस्कृती समजून न घेता त्यांच्यावर तथाकथित विकासाच्या योजना लादण्याचे एकतर्फी शासनमान्य प्रकार आहेत, त्यांच्यापुढे हे प्रयत्न अपुरे ठरण्याची भीती आहे. मुख्य प्रवाहात त्यांना बळेबळे ओढून प्रवाहपतिताप्रमाणे असहाय रितीने फरफटत नेण्यापेक्षा मुख्य प्रवाहाच्या बरोबरीने पण स्वत:ची सांस्कृतिक अस्मिता, आत्मगौरव अभिमानाने मिरवीत वाटचाल करायला शिकवणे ही आजची मुख्य गरज आहे. आणि केवळ त्यामुळेच आदिवासींमध्ये आत्मविश्वास, आत्मभान आणि आत्मनिर्भरता जागृत होईल.

त्यासाठी आदिवासी संस्कृती, तीमधील विविध कलाविष्कार यामागची मानसिक, सामाजिक व सांस्कृतिक भूमिका आदिवासीतर समाजाला समजावून देणे आवश्यक आहे. आदिवासी संस्कृतीत कलेला महत्त्वपूर्ण स्थान आहे. नागरीकरण, आधुनिकीकरण वा संस्कृतीकरणाच्या लाटेत आदिवासी कलेचा ऱ्हास होण्याकडे वाटचाल सुरू झालेली आहे. ज्या वेगाने आदिवासी शहरी संस्कृतीच्या प्रभावाखाली येत आहे तो वेग किती काळपर्यंत त्यांची कला व संस्कृती टिकवून ठेवील, हे सांगणे अवघड आहे. दुर्दैवाने जर आदिवासी कला विनाश पावल्या तर भारतीय पारंपरिक कलांचा आत्माच हरवून जाईल आणि हे टाळायचे असेल तर आदिवासी संस्कृती व कलेचा अभ्यास करून ती आदिवासींच्या धार्मिक, सामाजिक , सांस्कृतिक व पर्यावरणीय मूल्यांशी कशी निगडीत आहे हे दाखवून देण्याची जबाबदारी आदिवासींच्या अभ्यासकांवर आणि त्यांच्यामध्ये काम करणाऱ्यांवरआहे.

मानवशास्त्र विभाग, **नरेंद्र विश्वनाथ बोखारे**
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७.

## संदर्भ व आधार

१) बोखारे, नरेंद्र विश्वनाथ (२००३) 'आदिवासी कलाविष्कारातील सौंदर्यसंप्रेषण'. *संज्ञापनविद्या व ललितकला* - संपादक - रमेश नारायण वरखेडे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - पृष्ठे २३१ ते २४७

२) बोखारे, नरेंद्र विश्वनाथ (२०००) 'महाराष्ट्र समाज व संस्कृती; मानवशास्त्रीय दृष्टिकोन'. *हाकारा* (महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक), वर्ष २१, अंक ४ पृष्ठे

- ३ ते १८.

३) डेंगळे, नरेंद्र (२००३) 'वास्तुकला : आस्वाद आणि संज्ञापन' *संज्ञापनविद्या व ललितकला* संपादक र. ना. वरखेडे. य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक, पृष्ठे १३५ ते १५२.

४) थत्ते, राम, अनंत (२००३) 'स्थळ, काळ व परिस्थितीनुरूप कलेची वाटचाल', *संज्ञापनविद्या व ललितकला* संपादक र. ना. वरखेडे. य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक, पृष्ठे १०८ ते १३४.

५) गारे, गोविंद व सोनावणे उत्तमराव (१९८६) *आदिवासी कलाविश्व*, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

६) Anderson, R. L. (1989) *Art in Small Scale Societies* - Englewood Cliffs, N. J. (ed.), Prentice Hall.

७) Anderson, R. L. and Field, K. L. (1993) *Art in Small Scale Societies - Contemporary Readings* Prentice Hall.

८) Bharani, Enakshi (1974) *Folk and Tribal Designs in India*. Taraporwala and Sons Co. Pvt. Ltd. Mumbai.

९) Bokhare, N. V. (1993) 'The Art Mart : Commercialization of Tribal Arts'. In *'An Overview of Tribal Research Studies'*. Ed. Jain, N. S. and Tribhuvan R.D.; Tribal Research and Training Institute Pune. Pages 215-19.

१०) Bokhare N. V. (193) *Tribal Arts and Artefacts : Change and Continuity - An Anthropological Enxploration of the Material Culture of the Warli Tribals in Maharashtra*. Unpublished Project Report.

११) Coote and Shelton (1992) *Anthropology, Art and Aesthetics*. Clarendon Press, Oxford.

१२) Dalmia, Yashodhara (1986) 'The Sweep of Life'. In *The Warlis : Tribal Paintings and Legends* Ed. Laxmi Lal. Chemould Publications and Arts, Mumbai.

१३) Das A. K. (1979) *Tribal Art and Craft*. Agam Kala Prakashan, Delhi.

१४) Dehejia Harsha V. (1996) *The Advaita of Art* Motilal Banarasidas, New Delhi.

१५) Graburn Nelson, H. B. (1976) 'Art and Anthropology' In *Encyclopaedia of Anthropology*, Hunter D.E. and Whitten. P (eds.). Harper and Row Publishers.

१६) Jain Jyotindra (1984) *Painted Myths of Creation - Art and Ritual of an Indian Tribe.* Lalit Kala Academy, New Delhi.

१७) Jaykar Pupul (1980) *The Earthern Drum : An Introduction to the Ritual Artis in Rural India.* National Museum, New Delhi.

१८) Jaykar Pupul (1980) *The Earth Mother.* Pengain Book (India) Ltd. New Delhi.

१९) Kramrisch Stella (1985) 'The Ritual Arts of India'. In *Aditi - The Living Arts of India.* Ed. Smithsonian Institution Press, Washington D. C.

२०) Swaminathan J. (1992) 'Art and Adivasi'. In *Indigenous Vision* Ed. Geeti Sen. Indian International Centre (New Delhi) and SAGE Publication.

२१) Tuly Mark (1991) 'The Return of the Artist' In *No Full stops in India.* Penguin Books (India) Pvt. Ltd. New Delhi.